एकात्मिक बाल विकास सेवायोजना हया केंद्रपुरस्कृत योजनेसाठी पुरक पोषण आहार (SNP) अन्वये अर्थसंकल्पित केलेला निधी खर्च करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१७/प्र.क्र.२४८/का.५
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :१६ सप्टेबर, २०१७

वाचा :- (१) महिला व बाल विकास विभाग,शासन निर्णय क्र. एबावि २०१७/ प्रक्र ११७/का-५, दि.२० मे,२०१७

२) महिला व बाल विकास विभाग,शा. नि क्र. एबावि २०१७/ प्रक्र ११७/का-५, दि.२७ जुलै, २०१७

३) केंद्र शासन ,महिला व बाल विकास विभाग पत्र क्रमांक CD-II-१४/३/२०१७-CD-II, दिनांक ३ ऑगस्ट,२०१७.

प्रस्तावना :-

महिला व बाल विकास विभागामार्फत एकात्मिक बाल विकास सेवायोजना ही केंद्रपुरस्कृत योजना आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई या कार्यालयाकडून राबविण्यात येत आहे. SNP (पुरक पोषण आहार) या कार्यक्रमासाठी केंद्र व राज्य हिश्याचे प्रमाण ५०:५० असे ठरविण्यात आलेले आहे.

सन २०१७-१८ साठी SNP (पुरक पोषण आहार) या कार्यक्रमासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे रु.१२३६९५.१२ लाखाचा APIP तयार करुन मंजूरीसाठी पाठविलेला होता. त्यामध्ये केंद्र हिस्सा रुपये ६१८४७.५६ लाख व राज्य हिस्सा रुपये ६१८४७.५६ लाख असे निधीचे प्रमाण होते. तथापि, यापैकी केंद्र शासनाने दिनांक १७ जुलै,२०१७ च्या पत्रान्व्ये सन २०१७-१८ साठी पुरक पोषण आहार या कार्यक्रमासाठी रुपये ९९३३०.५६ लाख इतक्या रक्कमेस मान्यता दिली असून त्यामध्ये केंद्र हिस्सा रुपये ४९६६५.२८ लाख व राज्य हिस्सा रुपये ४९६६५.२८ लाख इतक्या रक्कमेचा समावेश आहे.

सन २०१७-१८ साठी SNP (पुरक पोषण आहार) या कार्यक्रमासाठी केंद्र व राज्य हिश्यासाठी shadow तरतुद रुपये ५९२५८.१० लाख अर्थसंकल्पित करण्यात आलेली आहे. यामध्ये केंद्र हिस्सा रुपये २९६२९.०५ लाख व राज्य हिस्सा रुपये २९६२९.०५ लाख असे निधीचे प्रमाण आहे. सन २०१७-१८ साठी SNP (पुरक पोषण आहार) या कार्यक्रमासाठी केंद्र शासनाने सर्वसाधारण प्रकल्प / आदिवासी प्रकल्प व विशेष घटक प्रकल्प यांच्यासाठी पहिला हप्त म्हणून रुपये ९८८१.७५ लाख इतका

निधी राज्य शासनास उपलब्ध करुन दिलेला होता. सदर निधी राज्याच्या कोषागारात जमा झालेला असल्याचे अर्थापाय कार्यासनाकडून प्रमाणित करुन घेण्यात आल्यानंतर केंद्र हिस्सा रुपये ९८८१.७५ लाख व राज्य हिस्सा रुपये ९८८१.७५ लाख असा एकूण रुपये १९७६३.५० लाख इतका निधी दिनांक २० मे,२०१७ च्या शासन निर्णयान्वये आणि केंद्र हिस्सा रुपये ९८८१.७५ लाख व राज्य हिस्सा रुपये ९८८१.७५ लाख असा एकूण रुपये १९७६३.५० लाख इतका निधी दिनांक २७ जुलै,२०१७ च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला आहे. आता या योजनेसाठी रु. १९७३१.१० लाख इतक्या अर्थसंकल्पित निधीपैकी शिल्लक असलेला अवितरीत निधी मधून केंद्र हिस्सा रुपये ५०६९.१४ लाख व राज्य हिस्सा रुपये ५०६९.१४ लाख असा एकून रुपये १०१३८.२८ लाख इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

सन २०१७-१८ साठी SNP (पुरक पोषण आहार) या कार्यक्रमासाठी केंद्रशासनाने सर्वसाधारण प्रकल्प / आदिवासी प्रकल्प व विषष घटक प्रकल्प यांच्यासाठी तीसरा हप्ता म्हणून रुपये ५०६९.१४ लाख इतका निधी राज्य शासनास उपलब्ध करुन दिलेला आहे. SNP (पुरक पोषण आहार) या कार्यक्रमासाठी केंद्र व राज्य हिश्याचे प्रमाण ५०:५० असे ठरविण्यात आलेले आहे. त्यामुळे SNP (पुरक पोषण आहार) या कार्यक्रमासाठी केंद्र हिस्सा रुपये ५०६९.१४ लाख व राज्य हिस्सा रुपये ५०६९.१४ लाख असा एकूण रुपये १०१३८.२८ लाख इतका निधी आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई यांना वितरीत करण्यास व खर्च करण्यास शासन मान्यता देत आहे.

सन २०१७-१८ मध्ये केंद्र व राज्य हिश्याखाली अर्थसंकल्पित केलेल्या व त्यामधुन वितरीत करावयाच्या व खर्च करावयाच्या निधीचा लेखाशिर्षनिहाय तपशील खालील प्रमाणे आहे.

(रुपये लाखात)

लेखाशिर्ष	अर्थ संकल्पित निधी	आयुक्त,ए.बा. विसे.यांना यापूर्वी वितरीत निधी	शिल्लक रहाणारा निधी	आयुक्त,ए.बा. विसे.यांना आता वितरीत करावयाचा निधी	शिल्लक रहाणारा निधी
२२३६१९२७ **(केंद्र)**	२९६२९.०५	१९७६३.५०	९८६५.५५	५०६९.१४	४७९६.४१
२२३६१९३६ **(राज्य**	२९६२९.०५	१९७६३.५०	९८६५.५५	५०६९.१४	४७९६.४१
एकुण	**५९२५८.१०**	**३९५२७.००**	**१९७३१.१०**	**१०१३८.२८**	**९५९२.८२**

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१६१४०३४०३६३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2017.09.16 13:53:23 +05'30'

(ला.रा.गुजर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मंत्री/राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सहाय्य
३) सचिव (महिला व बालविकास विभाग), मंत्रालय, मुंबई.
४) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई.
६) सर्व जिल्हाधिकारी.
७) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
८) सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास.
९) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
१०) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी/ग्रामीण/आदिवासी.
११) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई/नागपूर.
१२) सर्व महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद.
१३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४) निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई
१५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१६) कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (का.१४७२)/ वित्त विभाग (व्यय-६) मंत्रालय, मुंबई
१७) कक्ष अधिकारी (का-४) महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा/विधानपरिषद), विधानभवन,मुंबई.
१९) निवड नस्ती (कार्यासन-५)
